प्रेस नोट दि. ०६.०५.२०२५

आरोपी लोकसेवक 1.श्री. भुषण वशिष्ठ चोबे, वय ३१ वर्षे, पद- तलाठी / ग्राम महसुल अधिकारी, सज्जा वाघोली ता. जि. धाराशिव, रा. आदर्श नगर, यशश्री क्लासेसच्या जवळ, धाराशिव (खाते महसुल विभाग ), 2. भारत शंकर मगर, वय ६४ वर्षे, व्यवसाय- खाजगी लिपीक, रा.वाघोली ता. जि. धाराशिव ( खाजगी व्यक्ती)

| | |
|---|---|
| लाचलुचपत प्रतिबंधक विभाग | धाराशिव |
| पोलीस ठाणे | धाराशिव ग्रामीण जि.धाराशिव. |
| गुन्हा रजिस्टर नंबर व कलम | पोलीस ठाणे धाराशिव ग्रामीण गु.र.न. १०३/२०२५ कलम ७ अ, १२ भ्रष्टाचार प्रतिबंध अधिनियम सन १९८८. |
| आरोपीचे नाव व कार्यालय | 1.श्री. भुषण वशिष्ठ चोबे, वय ३१ वर्षे, पद- तलाठी / ग्राम महसुल अधिकारी, सज्जा वाघोली ता. जि. धाराशिव, रा. आदर्श नगर, यशश्री क्लासेसच्या जवळ, धाराशिव (खाते महसुल विभाग ),<br>2. भारत शंकर मगर, वय ६४ वर्षे, व्यवसाय- खाजगी लिपीक, रा.वाघोली ता. जि. धाराशिव ( खाजगी व्यक्ती) |
| लाचेची रक्कम | ५,०००/- रुपये लाचेची मागणी करुन तडजोड अंती ४,०००/- रुपये लाच रक्कम स्विकारली . |
| थोडक्यात माहिती | यातील तक्रारदार यांचे वडीलांचे नावे असलेल्या शेत गट क्र १५/१० मधील कुळाचे नाव कमी करण्यासाठी तहसील कार्यालय धाराशिव येथे अर्ज दाखल केला होता. सदर अर्जावरुन तहसीलदार धाराशिव यांनी मंडळ अधिकारी तेर यांना अर्जदार यांचे अर्जावरुन स्थळ पाहणी करुन पंचनामा करुन स्थळ पाहणी अहवाल सादर करण्याचे आदेशीत केले होते . त्यावरुन तक्रारदार यांचे शेताची स्थळ पाहणी करुन पंचनामा करुन स्थळ पाहणी अहवाल मंडळ अधिकारी यांचे मार्फतीने तहसीलदार यांना सादर करण्यासाठी तलाठी भुषण चोबे व त्यांचा खाजगी मदतनीस भारत मगर यांनी ५,०००/- रु. लाच रक्कमेची मागणी करुन तडजोडीअंती ४,०००/- रुपये लाच रक्कम स्विकारण्याचे मान्य करुन सदरची लाच रक्कम स्वत: स्विकारली वगैरे वरुन गुन्हा नोंद करण्यात आला आहे . |

सदरची कारवाई मा. संदीप आटोळे , पोलीस अधीक्षक, लाप्रवि छत्रपती संभाजीनगर , मा. मुकुंद आघाव , अपर पोलीस अधीक्षक ला.प्र.वि. छत्रपती संभाजीनगर यांचे मार्गदर्शनाखाली सिध्दराम म्हेत्रे पोलीस उप अधीक्षक , ला.प्र.वि. धाराशिव, पोलीस हवालदार नेताजी अनपट, पोलीस नाईक आशिष पाटील, पोलीस अंमलदार नागेश शेरकर ला.प्र.वि. धाराशिव युनिट यांनी केली आहे .

लाचलुचपत प्रतिबंधक विभागातर्फे नागरिकांना आव्हान करण्यात येते की, भ्रष्टाचार संबंधी माहिती असल्यास अगर लाच मागणाऱ्या लोकसेवकाबद्दल तक्रार असल्यास लाच लुचपत प्रतिबंधक विभाग, धाराशिव यांचेशी संपर्क साधावा.

**संपर्क पत्ता** - लाचलुचपत प्रतिबंधक विभाग , धाराशिव.

**संकेत स्थळ** - 1.acbwebmail@mahapolice.gov.in

2.dysposmanabad@gmail.com

**ऑनलाईन तक्रार अॅप्लीकेशन** - acbmaharashtra.net

**टोल फ्रि क्रमांक** - १०६४

**दुरध्वनी क्रमांक** - ०२४७२-२२२८७९

**पोलीस अधीक्षक , लाप्रवि , छत्रपती संभाजीनगर** - ९९२३०२३३६१

**पोलीस उप अधीक्षक , लाप्रवि , धाराशिव** - ९५९४६५८६८६

06/05/25

(सिध्दाराम म्हेत्रे)
पोलीस उप अधीक्षक
ॲन्टी करप्शन ब्युरो, धाराशिव

Scanned with OKEN Scanner